# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०७ मार्च, २०१७ / फाल्गुन १६, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### मुंबई पोलीसांच्या एल.सी.बी. शाखेने अंमली पदार्थ तस्कर गुलाम हुसेन आझाद याला अटक केल्याबाबत

**(१) * ७७७६८ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीसांच्या एल.सी.बी. शाखेने अंमली पदार्थ तस्कर गुलाम हुसेन आझाद व त्यांची मदतनीस महिला शिपाई यांना माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवडयात वा त्या सुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील कोंढवा व शिवाजीनगर परिसरात तस्कर गुलाम हुसेन आझाद यांचे डॉक्टर तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी असे सुमारे २०० ग्राहक असून मुंबई पोलीसांनी दीड कोटी रुपयांच्या अंमली पदार्थांसह अटक केलेल्या हॉलंडचा नागरीक किशोर नंदन याच्याशीही त्याचे संबंध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांनी अशी कोणतीही कारवाई केलेली नाही.

तथापि, नारकोटीक्स कंट्रोल ब्युरो, गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून दि.११.०१.२०१४ रोजी अशा स्वरुपाची कारवाई केली आहे.

-----------------

**पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२) * ७६१७५ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूरचे श्री महालक्ष्मी मंदिर, श्री जोतीबा देवस्थान यांसह ३०६७ मंदिरांचे व्यवस्थापन पाहणाऱ्या देवस्थान समितीने केलेल्या गैरव्यवहाराची राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याचे आश्वासन मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास देवूनही अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थान दानपेटीच्या रक्कमेचा गैरव्यवहार सीआयडीने सादर केलेल्या अहवालापेक्षा कित्येक पट अधिक असल्याचा दावा तक्रारकर्ते किशोर गंगणे यांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त देवस्थानाच्या चौकशीस सुरुवात होऊन पाच वर्षांहून जास्त कालावधी उलटूनही अद्याप अहवाल न येण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच हिंदु जनजागृती समितीसह अनेक संघटनांनी देवस्थान गैरव्यवहाराची चौकशी लवकर पूर्ण करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणाची चौकशी शासनाचे पत्र क्र. सीआयडी ०४१५/प्र.क्र.१७८/पोल-१२, दि.२२/०४/२०१५ आदेशान्वये गुन्हे अन्वेषण विभागाकडून करण्यात येत आहे. सदर प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने चौकशी अद्याप चालू आहे.

(२) हे खरे नाही.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती गैर कारभाराच्या चौकशीचे तक्रारदार श्री किशोर गंगणे हे नसून राष्ट्रीय हिंदु आंदोलन या संघटनेचे कार्यकर्ते डॉ. उदय धुरी हे आहेत.

(३) सदर प्रकरणाची चौकशी शासनाचे पत्र क्र. सीआयडी ०४१५/प्र.क्र.१७८/पोल-१२, दि.२२/०४/२०१५ आदेशान्वये गुन्हे अन्वेषण विभागाकडून करण्यात येत आहे. सदर प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने चौकशी अद्याप चालू आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने चौकशी अद्याप चालू आहे.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासानंतर विकासकांनी अतिरिक्त चटई क्षेत्रफळ सदनिका स्वरुपात म्हाडाला दिले नसल्याबाबत

**(३) * ७३८१३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाद्वारे टॉवर्स उभारणा-या विकासकांनी हजारो कोटींचे अतिरिक्त चटई क्षेत्रफळ (एफएसआय) सदनिकाच्या स्वरूपात म्हाडाला अद्याप सुपुर्द केले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील तब्बल ३७९ प्रकल्पात १ लाख ३७ हजार ३३२ चौमी इतके अतिरिक्त चटई क्षेत्रफळ म्हाडाला गत ८ ते १० वर्षात मिळाले नसल्यामुळे म्हाडा सुमारे ६ हजार कोटीहून अधिक रक्कमेपासून वंचित राहिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकारी व विकासक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मुंबई शहर बेटावरील उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रापैकी ३३ प्रकरणांमध्ये इमारतींच्या पुनर्विकासानंतर मंडळास देय असलेले १४३९७.२७ चौ.मी. इतके अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास दिले नसल्याची बाब सन २०११ मध्ये निदर्शनास आली आहे.
(२) मुंबई शहर बेटावरील उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रापैकी उपरोक्त ३३ प्रकरणे वगळता ४३२ प्रकरणांमध्ये म्हाडास १५६५२०.४१ चौ.मी. इतके अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ अनुज्ञेय असून त्यापैकी आतापर्यंत ३१३१९.७९ चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास प्राप्त झाले असून या प्रकरणांमध्ये अद्याप काम सुरु झालेले नाही किंवा काम प्रगतीपथावर आहे. म्हाडास बांधकाम पुर्ण झाल्यानंतर अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ अनुज्ञेय होते. सबब, ज्या प्रकरणांमध्ये अद्याप बांधकाम सुरुच झालेले नाही अशा प्रकरणांमध्ये म्हाडास प्राप्त होणारे अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मिळाले नाही व त्यामुळे म्हाडा सुमारे ६ हजार कोटीहून अधिक रक्कमेपासून वंचित राहिली आहे, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.
(३) पुनर्विकासानंतर मंडळास देय असलेले अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास दिलेले नसल्याचे निदर्शनास आलेल्या ३३ प्रकरणांपैकी विक्रीयुक्त बांधकाम अद्याप सुरु करण्यात आलेले नाही अशी २ प्रकरणे गुन्हा नोंदविण्यापूर्वी मंडळास अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपुर्द केले असे एक प्रकरण व न्यायप्रविष्ठ असलेले एक प्रकरण वगळता इतर २९ प्रकरणांमध्ये म्हाडामार्फत नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या आधारे मुंबई आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत तपास करण्यात येत असून २६ गुन्ह्यांमध्ये दोषारोपपत्रे दाखल करण्यात आले आहेत. २ गुन्ह्यांमध्ये कार्यवाही करण्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. तर एका गुन्ह्याचा तपास अंतिम टप्प्यात आहे. म्हाडातर्फे सदर विकासकांच्या मालमत्ता जप्ती करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या असून १४ विकासकांनी

एकूण ६४०९.२२ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास सुपुर्द केले आहे. (६३६७.०७ चौ.मी.+३३.१५ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळापोटी रोख रक्कम रुपये ९०,६६,८४७/- मंडळास प्राप्त).

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात सुस्थितीत असलेल्या रस्त्यांच्या दुरुस्ती प्रस्तावाला महानगरपालिकेने मान्यता दिल्याबाबत

**(४) * ७४१३८ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सुस्थितीत असलेल्या रस्त्यांची आवश्यकता नसतानाही दुरुस्ती दाखवून मुंबई महानगरपालिकेने एकूण ९० कोटीच्या रस्ते दुरुस्ती प्रस्तावाला माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तसेच आयुक्त, महानगरपालिका मुंबई यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गतवर्षी महानगरपालिकेच्या रस्ते गैरव्यवहाराची चौकशी प्रलंबित असताना पुन्हा तातडीने रस्ते दुरुस्ती प्रस्ताव मंजूर करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई शहरातील रस्त्यांच्या सद्य:स्थितीची प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांचे पृष्ठभाग दुरावस्थेत असलेले व दोषदायित्व कालावधी / पुनर्बांधणी प्रकल्पामध्ये समाविष्ट नसलेल्या रस्त्यांची यादी संकलित करुन सदर रस्त्यांच्या दुरुस्तीच्या रु. ८२.१८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास जानेवारी, २०१७ मध्ये महानगरपालिकेच्या स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी विहित ई-निविदा प्रक्रिया अवलंबिण्यात येऊन सदर प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली आहे.

तथापि सन २०१६ मध्ये निदर्शनास आलेल्या रस्ते गैरव्यवहार प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) येथे गत १७ वर्षांपासून मंजूर असलेले न्यायालय अद्याप सुरु न झाल्याबाबत

**(५) * ७४६४१ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि. पालघर) तालुक्यात गत १७ वर्षापुर्वी मंजूर करण्यात आलेले न्यायालय अद्याप बांधण्यात न आल्यामुळे नागरिकांना न्याय निवाड्याकरिता आपली प्रकरणे (केसेस) घेऊन जव्हार, वाडा किंवा भिवंडी येथील न्यायालयात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात आदिवासींची व गरीब शेतकऱ्यांची संख्या अधिक असल्याने मुख्यत्वे करुन जमिनीसंदर्भात प्रकरणे (केसेस) जास्त असल्यामुळे जव्हार-वाडा, भिवंडी येथे जाण्या-येण्याकरिता त्यांच्या वेळेचा व पैशांचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर न्यायालय बांधण्याबाबत स्थानिक नागरिकांनी सन २००२ पासून मा.मुख्यमंत्र्याकडे मागणी करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्वतंत्र न्यायालयाचा प्रस्ताव मंजूर असूनही सदर न्यायालय अद्याप न बांधण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच न्यायालय लवकर बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) हे खरे नाही.

विक्रमगड तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील फौजदारी खटले व दिवाणी दावे दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर जव्हार येथे दाखल करण्यात येतात.

राज्यातील विविध ठिकाणी न्यायालय स्थापन करण्याबाबतची शिफारस मा. उच्च न्यायालयाकडून शासनास करण्यात येते. त्यानुसार नवीन न्यायालय स्थापनेबाबतची कार्यवाही शासनाकडून करण्यात येते.

विक्रमगड येथे न्यायालय स्थापनेबाबतचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाकडून अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छेडा नगर, घाटकोपर (मुंबई) येथे मुंबई पोलीसांच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाने टाकलेला छापा

**(६) * ७४३१० श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विजय औटी (पारनेर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथील छेडा नगर बस स्थानकाजवळ ड्रग तस्कर प्रविण वाघेला याच्या मालकीच्या होंडा सीवीक वाहनावर मुंबई पोलीसांच्या अंमली पदार्थ

विरोधी कक्ष, घाटकोपर विभागाने दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास छापा टाकून सुमारे रुपये २ कोटी ४ लाख किंमतीचे १० किलो २०० ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) जप्त करुन सदर आरोपीस अटक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तपास पूर्ण करण्यात आला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरहू प्रकरणी तीन आरोपींवर कलम-८(क), सह २२(क), २९ एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी (जि.ठाणे) या रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(७) * ७६९८९ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहराच्या मध्यवर्ती भागांमधून शहराबाहेर जाण्या-येण्यासाठी रुपये ५० कोटीचा निधी मंजूर करून एमएमआरडीए मार्फत अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी या रस्त्याचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने रस्त्यावर मोठे खड्डे पडून अत्यंत दुरवस्था झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी या रस्त्यांची दुरुस्ती, देखभाल व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महापालिकेतील महसूली गावांमधील शेत जमीनीसह नैसर्गिक नाले भराव टाकून बळकाविण्यात आल्याबाबत**

**(८) * ७३९११ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महापालिकेतील महसूली गावांचा एमएमआरडीए क्षेत्रात समावेश झाल्यामुळे भूमाफियांनी सदर गावांमधील ग्रामस्थांच्या शेतजमीनीसह नैसर्गिक नाल्यात मातीचा भराव टाकून मोठया प्रमाणात जमीनी बळकाविल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक भूमाफियांना यापूर्वी मातीचा भराव टाकून जमीन बळकावण्यास ग्रामस्थांनी संघटितपणे विरोध केल्याने उत्तन-सागरी पोलीसांनी १५० ग्रामस्थांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी भूमाफिया तसेच एमएमआरडीएचे व महसूल विभागाचे संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी उत्तन सागरी पोलीस ठाण्यात कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दाभोली-मोबारवाडी (ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग) येथे नविन खारलॅण्ड बंधारा बांधण्याबाबत**

**(९) * ७५९४६ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोली-मोबारवाडी (ता.वेंगुर्ले, जि.सिंधुदुर्ग) येथे बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याचे

बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने सन २०१६ च्या पावसाळयात सदरहू बंधारा संपूर्णत: वाहून गेल्याने सुमारे २५० एकर जमिन नापिक झाली असून माड बागायती, पोफळी, भातशेतीचे नुकसान होवून विहिरीच्या पाण्यावर पिवळया प्रकारचा तवंग जमा झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी भरतीच्या वेळी पाणी संपूर्ण गावात शिरुन तेथील घरांनाही धोका निर्माण झाल्यामुळे सदरहू वाहून गेलेल्या बंधाऱ्याबाबत शासनस्तरावरून विनाविलंब चौकशी होवून संबंधित दोषीं विरोधात कारवाई करुन नवीन खारलॅण्ड बंधारा बांधण्यात यावा अशा मागणीचे एक निवेदन दाभोली येथील नानंदा विकास संस्थेचे अध्यक्ष श्री. संदिप पाटील यांनी शिष्टमंडळासह बंदरे विकास राज्यमंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेवून माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवडयात वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनानुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दाभोली-मोबारवाडी येथे विना विलंब खारबंधाऱ्याचे बांधकाम हाती घेवून तो लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गारपोली (ता.कर्जत, जि.रायगड) येथील समृध्दी वसाहतीमधील १३०० कुटुंबियांना विकासकाने मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन न दिल्याबाबत

**(१०) * ७७९५६ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारपोली (ता.कर्जत, जि.रायगड) येथील समृध्दी वसाहतीमधील १३०० कुटुंबियांना पोद्दार बांधकाम विकासकाने करारानुसार आजमितीस पिण्याचे पाणी व अन्य मुलभूत सोयी सुविधा तसेच सोसायटी ऑफिस बांधकाम पूर्णत्त्वाचा दाखला, भोगवटा प्रमाणपत्र दिले नसल्याने सदर फसवणुक केल्याप्रकरणी

रहिवाश्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी विकासकाविरुध्द शासनाकडे तसेच पोलीस स्टेशन, कर्जत यांच्याकडे लेखी तक्रारी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पोद्दार बांधकाम विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच समृध्दी वसाहतीमधील कुटुंबियांना मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

सदर प्रकरणी विकासकाविरुद्ध कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.११९/२०१६ भा.दं.वि.सं.क. ४२०, ५०६, मोफा कायदा कलम ३, ४, ५, ७, ११, १२(अ) अन्वये दिनांक १०.०७.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सद्यःस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) समृद्धी वसाहतीतील कुटुंबियांना दिवाबत्ती व कचरा उचलण्याच्या सोयीसुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तथापि, सदर वसाहतीमधील कुटुंबियांना मुलभूत सोयीसुविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधित विकासकाची आहे. सदरच्या सोयीसुविधा विकासकाने पुरविल्या नसल्याने तसेच फसवणुक केली असल्यामुळे विकासकावर कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.११९/२०१६ भा.दं.वि.सं.क. ४२०, ५०६, मोफा कायदा कलम ३, ४, ५, ७, ११, १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई अग्निशमन दलातील जवानांना दिलेली सुरक्षा साधने कालबाह्य झाल्याबाबत

**(११) * ७७९९८ ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अग्निशमन दलातील जवानांकडे आगीशी लढण्यासाठी असलेली

उपकरणे कालबाहय ठरली असून यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या तिस-या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेल्ट, बॅटरी, वॉकीटॉकी, शुज, हेल्मेट, हॅमर, अग्निप्रतिबंधक कपडे इ. साधनांची मुदत सन २०१३ मध्ये संपलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अग्निशमन दलामधील एकुण ३०१० पदांपैकी २२२७ पदे भरण्यात आली असून उर्वरीत ८८३ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती अग्निशमन दलातील जवानांना अद्ययावत उपकरणे देणेबाबत तसेच रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच अग्निशमन दलासंदर्भात सन २०१५ मध्ये दिलेल्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

आंतरराष्ट्रीय मानकानुसार या उपकरणांसाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. सदर साधने सुस्थितीत असल्याने आजही वापरात आहेत. त्यामुळे उपकरणे कालबाहय झाल्यामुळे जवानांना अडचणींना सामोरे जावे लागते हे खरे नाही.

तथापि, सततच्या वापरामुळे काही उपकरणे वापरायोग्य नसल्याचे आढळल्यास ती तात्काळ बदली करण्यात येतात.

(३) मुंबई अग्निशमन दलाच्या आस्थापनेवर एकूण ४१९७ पदे आहेत, त्यापैकी २६८७ पदे भरण्यात आली असून १५१० पदे रिक्त आहेत.

(४) मुंबई अग्निशमन दलातील जवानांकरीता सन २०१६-१७ करीता अद्ययावत स्व:संरक्षण उपकरण संच (पी.पी.ई.) खरेदीची प्रक्रिया अंतिम टप्प्यावर आहे. या उपकरणांचे नमुने आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेमध्ये तपासणीकरीता पाठविण्यात आलेले असून चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुरवठादारास पुरवठा आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात येतील.

सध्या ७७४ अग्निशामकांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यापैकी २८० उमेदवारांचे प्रशिक्षण सुरु आहे. उर्वरित उमेदवारांचे प्रशिक्षण टप्प्याटप्प्याने घेण्यात येणार आहे.

तसेच, उर्वरित ७३६ पदे टप्प्याटप्प्याने भरण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(५) सन २०१५ मध्ये सत्यशोधक समितीने दिलेल्या ३० शिफारशींची अंमलबजावणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

अडकलेल्या पक्ष्यांची व प्राण्यांची सुटका करणे, पडलेल्या झाडांमुळे वाहतुकीला होणारा अडथळा दूर करणे व रस्त्यावर पडलेल्या ऑईलमुळे होणारे अपघात याप्रकरणी अग्निशमन दलास न बोलाविता संबंधित विभागामार्फत कार्यवाही करण्याची शिफारस उपरोक्त समितीने केलेली होती. परंतु याबाबत पर्यायी व्यवस्था अद्याप पूर्ण न झाल्यामुळे सद्य:स्थितीत सदर काम महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत करण्यात येत आहे.

----------------

**उल्हासनगर महापालिका (जि.ठाणे) हद्दीतील रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे न करता देयके अदा करण्यात आल्याबाबत**

**(१२) * ७६८१८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महापालिका (जि.ठाणे) हद्दीतील पावसाळ्यापूर्वी रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी व दुरुस्तीसाठी ४ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून खड्डे न भरताच देयके अदा करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तद्नुसार खड्डे न भरता तसेच दुरुस्ती न करताच देयके काढणाऱ्या महापालिकेच्या संबंधित अधिकारी व खड्डे भरण्याच्या निविदा भरणाऱ्या कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०१.०१.२०१७ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रभाग समिती क्रमांक ३ मध्ये, अत्यावश्यक दुरुस्तीच्या नावाखाली कोणत्याही मंजुरीविना ४ कोटी रुपयांचे काम केले व उर्वरित प्रभागामध्ये खड्डे भरुनही खड्डे तसेच दिसत असल्याची बातमी प्रसिध्द झाली होती हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१५-१६ मध्ये उल्हासनगर शहरातील रुपये ३.८८ कोटी रकमेची रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची कामे रितसर निविदा प्रक्रियेद्वारा निवडलेल्या कंत्राटदाराकडून पूर्ण करण्यात आली आहेत.

सदर कंत्राटदाराने खड्डे बुजविण्याची कामे पूर्ण केल्यानंतर उल्हासनगर महानगरपालिकेकडून रु. ५० लाख इतक्या रकमेचे देयक अदा करण्यात आले आहे.

सदर कामाची त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक तपासणी सुरु असून, सदर तपासणी पूर्ण झाल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत अंतिम देयक अदा करण्यात येणार आहे.

सदर कंत्राटदाराने दिलेली कामे पूर्ण केल्यामुळे याबाबत कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही.

-----------------

**नाशिक येथे बनावट नोटा जप्त करण्यात आल्याबाबत**

**(१३) * ७४१२० श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ता छबु नागरे यांच्याकडून १ कोटी ३५ लाख रुपयांच्या बनावट नोटा पोलीसांनी जप्त केल्या असून इतर ११ जणांना अटक केल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहरातील खुटवड नगरमधील नागरे यांच्या ओसम ब्युटीपार्लरमध्ये बनावट नोटा छापण्याचा कारखाना असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पोलीसांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि. २३/१२/२०१६ रोजी छबू नागरे व इतर १० आरोपींताकडून १ कोटी ३५ लाख रुपयांच्या बनावट नोटा पोलीसांनी जप्त केल्या असून त्यावेळी ११ आरोपींना अटक केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी आडगांव पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २१५/२०१६ भा.दं.वि. कलम ४८९ अ,ब,क,ड,ई, १२०(ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात एकूण १४ आरोपी निष्पन्न झालेले आहेत. सदर गुन्हा तपासावर आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**कोंढवा (जि.पुणे) येथील बेक्स अॅड केक्स बेकरीला लागलेल्या आगीत कामगारांचा झालेला मृत्यू**

**(१४) * ७५६६२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढवा बु. (जि.पुणे) येथील बेक्स अॅड केक्स बेकरीत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लागलेल्या आगीत ६ कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामगारांना काम करण्यासाठी परप्रांतातून आणण्यात आले होते तसेच त्यांनी पलायन करू नये याकरिता त्यांना जबरदस्तीने बंदिस्त करून ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेक-यांमधील बहुतेक कामगारांची कामगार आयुक्तालयाकडे नोंदच नसल्याचे तसेच या व्यवसायात तब्बल ३० ते ४० टक्के कामगार हे वेठबिगार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मृत कामगारांच्या कुटूंबियांना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली आहे तसेच बेकरी चालक व मालक यांचेवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.
सदरची बाब दि. ३०/१२/२०१६ रोजी पहाटे ५ वाजून ७ मिनीटांनी पोलिस विभागाच्या निदर्शनास आलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सदरील ६ कामगार हे परप्रांतिय होते. पोलीस विभागाच्या एफ.आय.आर. मध्ये नमुद केल्यानुसार सदरची बेकरी बंद झाल्यावर त्या कामगारांची आत झोपण्याची व्यवस्था करण्यात आली होती. बेकरी मालक कामगारांना बेकरीत ठेवून बाहेरुन शटरला कुलूप लावत असत.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ च्या कलम ७(१) नुसार आस्थापनेने आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर व नोंदणी शुल्काचा भरणा केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केले जाते. हया नोंदणी प्रमाणपत्रामध्ये केवळ कामगारांची संख्या नमूद असते परंतु कामगारांची यादी नसते.

(४) क्षेत्रिय दुकाने निरीक्षक यांनी संबंधित आस्थापने विरुध्द महाराष्ट्र दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ व किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत निरीक्षण शेरे पारित करुन संबंधित आस्थापनेवर खटले दाखल करण्यात आले असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे.

तसेच दि. ३१/१२/२०१६ रोजी मा. कामगार न्यायालय तथा नुकसान भरपाई आयुक्त, पुणे यांना ६ मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई मिळणेबाबत कळविण्यात आले आहे.

याबाबत क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी व क्षेत्रिय दुकान निरीक्षक यांनी घटनास्थळी दि.१०/०१/२०१७, दि.१८/०१/२०१७ व दि.३०/०१/२०१७ रोजी प्रत्यक्ष भेट दिली असता सदरची आस्थापना बंद स्थितीत असल्याने व आस्थापनेचे मालक अटक असल्याने मृत कामगारांबाबत माहिती उपलब्ध होवू शकली नाही. सदर मृत कामगारांच्या नातेवाईक देखील उपलब्ध न झाल्याने मृत कामगारांची कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नसल्याने सदर मृत कामगार हे वेठबिगार या संज्ञेत येतात किंवा कसे, हे निश्चित सांगता येणार नाही.

सदर घटना घडल्यानंतर आस्थापनेच्या तीन भागीदारांना अटक करण्यात येऊन कोंढवा पोलीस स्टेशनने संबंधित आस्थापना मालकाविरुध्द भारतीय दंड विधान अधिनियमाच्या कलम ३०४, ३४१, ३४२ व कलम ३४ तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४७८ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील मिहान प्रकल्पामध्ये जागा घेतलेल्या ७७ कंपन्यांपैकी केवळ २७ कंपन्याच कार्यरत असल्याबाबत**

**(१५) * ७४०४९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पाची मल्टी मॉडेल इंटरनॅशनल कार्गो हब ॲण्ड एअरपोर्ट ॲट नागपूर अशी संकल्पना असून सद्या मिहानमध्ये कार्यरत कंपन्यांचा एव्हिएशनशी कोणताही संबंध नसून तेथे औषधी, वैद्यकीय, पर्यटन, डाळ मिल आणि शाळा, कॉलेज उभारण्यात येत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केलेल्या पाहणीत निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिहान सेझमध्ये दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ अखेर जागा घेतलेल्या ७७ कंपन्यांपैकी केवळ २५ कंपन्याच कार्यरत असून त्यामध्ये १० हजार लोकांना रोजगार मिळाला आहे व त्यामधील ७० टक्क्यांपेक्षा जास्त लोक हे परराज्यातील आहेत तसेच मिहानमध्ये जागा विकत घेतलेल्या कंपन्या आता उद्योग सुरु करत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मिहानमध्ये उद्योगास अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

नागपूर येथील मिहान प्रकल्प केवळ मल्टी मॉडेल इंटरनॅशनल कार्गो हब ॲण्ड एअरपोर्ट या उद्दिष्टांसाठी मर्यादित नसून या प्रकल्पाचे क्षेत्र विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) म्हणून विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे एव्हीएशन व्यतिरिक्त अन्य उद्योग-व्यवसायदेखील उभारण्यात येत आहेत.

(२) होय.

या ठिकाणी २५ कंपन्या सुरु झाल्या असून त्यामध्ये १० हजार लोकांना रोजगार मिळाला आहे व या कंपन्यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांच्या

उद्योगामध्ये जास्तीत जास्त स्थानिक लोकांना रोजगार देण्यात आला आहे. तसेच १० नवीन कंपन्या येत्या वर्षभरात त्यांचे उत्पादन सुरु करणार आहेत.
(३) वर नमूद परिस्थितीच्या अनुषंगाने प्रश्न उद्‌भवत नाही.

मिहानमध्ये एव्हीएशन उद्योगासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी जमिनीच्या किंमतीमध्ये ३३ टक्के सूट तसेच व्हॅट या करामधून देखील सूट देण्याचा निर्णय महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने व शासनाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाकण (जि.पुणे) नाणेकरवाडी येथील कापसाच्या गोदामाला लागलेल्या आगीत कामगारांचा झालेला मृत्यू

**(१६) * ८०९८६ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकण (जि.पुणे) नाणेकरवाडी येथील कापसाच्या गोदामाला माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये आग लागली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आगीत चार महिलांसह पाच कामगारांचा होरपळून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत कामगारांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.

सदर आगीमध्ये चार महिला कामगार व एक पुरुष कामगार असे एकुण पाच कामगारांचा भाजून मृत्यु झालेला आहे.
(३) दिनांक २०/१०/२०१६ रोजी सकाळी ०९.४५ वा. चे सुमारास चाकण येथील सना एन्टरप्रायजेस येथील कॉटन वेस्टचे गठ्ठयाचे साठा केलेल्या गोडाऊनला अचानक आग लागून गोडाऊनमधील कॉटन वेस्टचे गठ्ठयांचे जळून नुकसान झालेले आहे. सदर बाब चाकण पोलीस स्टेशन येथे अकस्मात जळीत रजिस्टर

नंबर २१/२०१६ अन्वये दाखल असुन गु.र.नं. १०७७/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणातील तीन आरोपींना अटक करण्यात आली होती.

या संबंधात संबंधित आस्थापना मालकाने कामगाराच्या वारसांना वेतनापोटी रु. २६,२८०/- व उपदान अनुज्ञेय असणा-या दोन मृत कामगारांच्या वारसाना रु. ७,८००/- एवढी उपदानाची रक्कम अदा करण्यात आली आहे. किमान वेतनापेक्षा कमीवेतन मिळणा-या चार मृत कामगारांच्या वारसांना रु. ८७,२५०/- एवढी रक्कम अदा करण्यात येत आहे. तसेच मृत कामगारांच्या वारसांना रु. १२,४३०/- इतक्या रक्कमेचे धनादेश बोनस पोटी अदा केले आहेत.

त्याचप्रमाणे संबंधित मालकाविरुध्द किमान वेतन अधिनियम १९४८, वेतन प्रदान अधिनियम १९३६, प्रसुती लाभ अधिनियम १९६१ आणि समान वेतन अधिनियम १९७६ अंतर्गत मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात आले असून ते न्यायप्रविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ (जि.यवतमाळ) शहरात एअर लिंक कंपनीमार्फत बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१७) * ७९१५२ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) शहरातील प्रत्येक चौकात जिल्हा नियोजन समितीकडून ५३ लाख रुपये निधी खर्च करुन सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॅमेरे बसविण्याचे कंत्राट एअर लिंक या खाजगी कंपनीला देण्यात आले असून कंपनीने निकृष्ट दर्जाचे कॅमेरे बसविले असून त्यात इतरही अनेक त्रुटी आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) यवतमाळ शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकरिता सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांचेकडुन एकूण रु.७१.६० लाख एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधीमधून यवतमाळ शहरात एकूण ६८ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) सदर सीसीटीव्ही कॅमेरे एअर लिंक या कंपनीमार्फत बसविण्यात आले आहेत. सदर कंपनीने कराराप्रमाणे कॅमे-यांची देखभाल व दुरुस्ती न केल्यामुळे त्यांची रु.१३,१२,०८०/- एवढी रक्कम व रु.२,१४,०००/- एवढी अनामत रक्कम रोखून ठेवण्यात आली आहे. तसेच सदर कंपनीने कराराचा भंग केल्यामुळे कंपनीविरुध्द पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश विभाग, यवतमाळ यांनी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असुन त्याबाबतची चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील नैसर्गिक नाला बुजवून अतिक्रमण करण्यात आल्याबाबत

**(१८) * ७९१७९ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील जुना बुधगांव रस्त्यावर सर्व्हे नं. १२३ हा हरित पट्टा असून या ठिकाणी इदगाह मैदानाजवळील नैसर्गिक नाला बुजवून बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन प्लॉट पाडून बांधकाम करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ च्या अखेरीस निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व्हे नंबर मध्ये प्लॉट पाडून बांधकाम करण्याची परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन संबंधीत प्लॉट धारक, खरेदी विक्री करणारे तथा प्रशासकीय अधिकारी यांचेवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबतची तक्रार अतिक्रमण विरोधी कृती समिती सांगली यांच्याकडून दिनांक ०९/११/२०१६ रोजी महानगरपालिकेस प्राप्त झाली. हे खरे आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून जागेची पाहणी करण्यात येऊन सदर ठिकाणी जमिनीमध्ये मुरुमाचा भराव टाकण्याचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आल्यावरुन भर टाकण्याचे काम थांबविण्यात आले आहे.

(२), (३) व (४) सर्व्हे क्र.१२३ ही जागा विकास योजना आराखडा व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, सांगली यांच्या नकाशा नुसार पुर्णत: पूरपट्ट्यात येत असल्याने सदर ठिकाणी महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारची विकास विषयक परवानगी देण्यात आलेली नाही.

तथापि, सदरहू सर्व्हे क्र.१२३ मध्ये बेकायदेशीर भूखंड पाडून त्याची विक्री केली किंवा कसे याबाबत महानगरपालिकेकडून चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

**नाशिक महापालिकांतर्गत रस्ते डांबरीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१९) * ७४६६२ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये १९२ कोटी रुपयांचे अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याची कामे सुरु असून शहरात अनेक ठिकाणी चांगले रस्ते फोडून नवे रस्ते तयार करण्याच्या कामात गैरव्यवहार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

- नाशिक महानगरपालिका हद्दीतील विविध रस्त्यांच्या खडीकरण, डांबरीकरण व अस्तरीकरणाच्या रु.१९१.४० कोटी रकमेच्या कामांना नाशिक महानगरपालिका महासभेने दि.७.१२.२०१५ रोजी प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

- सदर कामांसाठी विहित निविदा प्रक्रिया ही जानेवारी ते मार्च २०१६ या काळात राबविण्यात येऊन या कामांचे मे २०१६ ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत कार्यादेश देण्यात आले.
- या कामांमधील विविध कॉलनी रस्त्यांची खडीकरणाची कामे पुर्ण झाली असून, रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे ७० टक्के पर्यंत पुर्ण झाली आहेत.
- एम.आय.डी.सी. मधील रस्त्यांचे डांबरीकरण व अस्तरीकरणाची कामे ८० टक्के पर्यंत पुर्ण झाली आहेत. तसेच मुख्य डी.पी. रस्त्यांचे रुंदीकरण, डांबरीकरण व अस्तरीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.
- सदर कामे ही प्रचलित निकषातील परिमाणकानुसार व नागरीकांच्या तसेच लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार घेण्यात आली आहेत.

सदर कामांची शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक यांचेकडून तांत्रिक तपासणी करण्यात येऊन कामांची गुणवत्ता व दर्जा मानकानुसार राखला जात असल्याने, यात गैरव्यवहार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथील आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या मैदानातील विद्युत व्यवस्थेचे काम पूर्ण नसतांना कंत्राटदारास देयके अदा करण्यात आल्याबाबत

**(२०) * ७४१४९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारजे (ता.हवेली,जि.पुणे) येथील आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या मैदानातील विद्युत व्यवस्थेच्या कामांसाठी महानगरपालिकेने स्थायी समितीची मान्यता न घेता अनियमितपणे खर्च केला असून सदर कामे पूर्ण केली नसतांनाही संबंधित कंत्राटदारास ९० लक्ष रुपयांची विद्युत कामांची देयके सन २०१६ मध्ये अदा केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- वारजे येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट स्टेडियम मधील विद्युतीकरणासाठी खर्च करण्यास मुख्य सभेने दि.२२.१.२०१६ रोजी मान्यता दिलेली आहे.
- विहित निविदा प्रक्रीयेनंतर स्थायी समितीने सर्वात कमी दराच्या पात्र निविदाधारकाच्या रु. २.६२ कोटी रकमेच्या निविदेस मान्यता दिली . तद्नंतर दिनांक २८.३.२०१६ रोजी कार्यादेश देण्यात आले.
- याकामाकरीता आजमितीस रू.१,९६,८४,८३४/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.
- सदर प्रकरणी उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी व कार्यकारी अभियंता(विद्युत) यांचेकडून चौकशी करण्यात आली होती. तथापि, विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडून अनियमितता झाली आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी उप आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत चौकशी करण्यात येत आहे.
- चौकशी प्रलंबित असतानाही रूपये १,०६,०६,५८८/- चे देयक अदा केले असल्याने संबंधीतांविरूध्द चौकशी करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.
- चौकशी विनाविलंब पूर्ण करण्याबाबत तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणतेही देयक अदा करू नये अशा सूचनाही पुणे महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चर्नीरोड, मुंबई येथील सैफी रुग्णालयाच्या आवारातील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(२१) * ७५२२६ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चर्नीरोड, मुंबई येथील सैफी रुग्णालयाच्या आवारात पालिकेच्या परवानगीशिवाय ३ हजार चौरस मीटरचे बांधकाम करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास नियंत्रक नियमावली अंतर्गत बांधकाम केलेली जागा स्मशानभूमीकरिता दर्शविली असल्याने सदर भागात बांधकाम करण्याची परवानगी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १०.०१.२०१७ रोजी चर्नी रोड येथील सैफी रुग्णालयाच्या आवारात सुमारे ११४० चौ. फुटाचे बांधकाम सुरु असल्याचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

(२) विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत बांधकाम केलेली जागा स्मशानभूमी दाखविली असल्याने या भागात बांधकाम करण्याची परवानगी महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेली नाही.

(३) सदर प्रकरणी दिनांक ११.०१.२०१७ रोजी सैफी रुग्णालयास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४अ अन्वये नोटीस बजावण्यात आली.

तद्नंतर सैफी रुग्णालयाचे वास्तुविशारद यांनी सदरचे बांधकाम दिनांक २२.०१.२०१७ पर्यंत निष्कासित करण्यात येईल असे कळविले होते.

सदरचे बांधकाम सैफी रुग्णालयाने दिनांक ०१.०२.२०१७ रोजी स्वत:हून निष्कासित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर एमआयडीसीतील सनफार्मा कंपनीच्या कारखान्यात स्फोट होऊन कामगारांचा झालेला मृत्यू

**(२२) * ७६८९४ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर एमआयडीसीतील सनफार्मा कंपनीच्या कारखान्यात स्फोट होऊन लागलेल्या आगीत दोन कामगार मृत तसेच दोन जण भाजल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच आगीत मृत झालेल्या २ कामगारांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे काय तसेच उक्त प्रकरणी दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

दोन कामगारांचा घटनेच्या दिवशी मृत्यू झाला व दोन जखमी कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सदर घटनेत एकूण ४ कामगारांचा मृत्यु झाला आहे.

(२) उप संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, अहमदनगर व पोलिस विभाग, अहमदनगर यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली आहे.

सदर कारखान्यातील रिकाम्या जागेत एक खड्डा खोदण्याचे काम घटनेच्या १० दिवस आधीपासून सुरु होते. सदर खोदकामाच्या बाजूला असलेल्या पिटमध्ये प्रक्रियेतील सांडपाण्यात ज्वालाग्रही रसायनांचा समावेश असतो. अपघाताच्या दिवशी पिटमधील सांडपाणी खोदकामाच्या ठिकाणी झिरपून आले व खोदकामा दरम्यान वापरात असलेला ब्रेकर व दगड यांचे घर्षण होवून ठिणगी मिळाली व सदर ज्वालाग्रही रसायनांनी पेट घेतला.

सदर प्रकरणातील प्रत्येक मृत कामगाराच्या वारसांना नुकसान भरपाई व सानुग्रह अनुदानाची एकत्रीत रक्कम रु. २५ लाख (एकूण रु. एक कोटी) देण्याचे कारखाना व्यवस्थापनाने मान्य केले असून त्यापैकी रु.२९,३८,६४०/- नुकसान भरपाई आयुक्त, अहमदनगर यांचे न्यायालयात जमा करण्यात आलेले आहेत. प्रत्येकी पाच लाख रुपये (एकूण रु.२० लाख ) मृत कामगारांच्या वारसास धनादेशाद्वारे देण्यात आले आहेत. उर्वरीत रु.५०,६१,३६०/- तीन महिन्यात देण्यात येणार आहेत. अशाप्रकारे सर्व बाधितांना आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे.

सदर घटनेमध्ये कारखाने अधिनियम १९४८ च्या तरतुदींचा भंग आढळून आल्यामुळे मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर यांच्या न्यायालयात कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द २ खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच, एमआयडीसी, अहमदनगर, पोलिस स्टेशन यांनी अकस्मात मृत्युची घटना म्हणून नोंद घेऊन त्यांचा तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**लोटे औदयोगिक वसाहतीतील (जि.रत्नागिरी) योजना**
**इंटरमिडियट्स कंपनीत झालेल्या वायुगळतीबाबत**

**(२३) * ७४१८० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील लोटे औदयोगिक वसाहतीमधील योजना इंटरमिडियट्स या केमिकल कंपनीमध्ये दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वायूगळती होवून झालेल्या स्फोटात दोन कामगारांसह तीन जण गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोटे औदयोगिक वसाहतीमध्ये माहे ऑक्टोबर, २०१६ पासून सातत्याने वायुगळती, स्फोट अशा दुर्घटना वारंवार घडत असून त्यामध्ये तीन कामगारांचा मृत्यू व अनेक कामगार गंभीररित्या जखमी झालेले असून कामगारांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असताना शासकीय यंत्रणेमार्फत कारखानदारांविरूध्द कोणतीही कारवाई न करता त्यांना संरक्षण दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि. १२/०१/२०१७ रोजी सदर कारखान्यात रंगकाम करताना एका कामगाराने ओलियम टाकीच्या पाईपवर पाय दिल्यामुळे कामगाराच्या वजनामुळे तो पाईप ओलियम टाकीच्या व्हॉल्वमधून तुटला. टाकीतील ओलियमच्या वाफा परसल्यामुळे रंगकाम करणा-या दोन कामगारांना भाजण्याच्या जखमा झाल्या. तर, कारखान्याबाहेरील २ महिलांना ओलियमची किरकोळ बाधा झाली. उपचारानंतर सर्व बाधीतांना रुग्णालयामधुन घरी सोडण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

घडलेल्या दुर्घटनेबाबत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांच्याकडून कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

लोटे औद्योगिक वसाहतीमधील नंदादिप केमिकल्स प्रा. लि. या कारखान्यामध्ये दि. १५/१०/२०१६ रोजी झालेल्या स्फ़ोटामुळे एका कामगाराचा मृत्यु झाला.

सुप्रिया लाईफसायन्स लि. या कारखान्यात दि. २५/१०/२०१६ रोजी प्लॅश फ़ायर मुळे जखमी झालेल्या २ कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यु झाला आणि ३ कामगार उपचारानंतर कामावर रुजु झाले आहेत.

योजना इंटरमेडीयट्स प्रा. लि. या कारखान्यामध्ये दि. १२/०१/२०१७ रोजी ओलियम या रसायनाची गळती झाली. तिन्ही प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, कोल्हापुर मार्फत कारखान्यांचे भोगवटादाराविरुध्द व कारखाना व्यवस्थापका विरुध्द खटले दाखल करण्यात आले आहेत.

नंदादिप केमिकल्स प्रा. लि. या कारखान्यातील मृत कामगाराच्या वारसास नुकसान भरपाईची रक्कम रु. ८,३९,८००/- व्यवस्थापनाने मा. आयुक्त, नुकसान भरपाई, रत्नागिरी यांचेकडे जमा केलेली आहे.

सुप्रिया लाईफसायन्स लि मधील एका मृत कामगारासंर्भात रु. ८,७९,८००/- व दुस-या मृत कामगारासंदर्भात रु.७,२५,४८०/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम मा. आयुक्त, कामगार नुकसान भरपाई, रत्नागिरी यांचे न्यायालयात जमा केलेली आहे. याव्यतिरिक्त व्यवस्थापनाने सदर दोन्ही मृत कामगारांच्या वारसास सानुग्रह अनुदान म्हणून अनुक्रमे रु. ११,२०,२००/- व रु.१७,०४,५२०/- अदा केलेल्या आहेत. इतर तीन जखमी कामगारांना प्रत्येकी रु.५०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून अदा केलेली आहे. कामगारांच्या उपचाराचा खर्च व्यवस्थापनाने केलेला आहे.

योजना इंटरमेडीयट्स प्रा. लि. या कारखान्यामधील कामगारांचा वैद्यकीय उपचारांवरील खर्च रु.३,००,०००/- व्यवस्थापनाने केलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे शहरातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता पांझरा नदीत सोडल्यामुळे झालेले प्रदुषण

**(२४) * ७४३७२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता पांझरा नदीत सोडले जात असल्यामुळे नदीप्रदूषण वाढले असून याबाबत प्रदूषण नियामक मंडळाने महापालिकेला नोटीस दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेने प्रदूषण मंडळाला सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरु करण्याचे लेखी कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पांझरा नदीच्या दोन्ही बाजूला गटारे बांधून शहरातील सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पात प्रक्रिया करुन नदीपात्रात सोडायचे असा प्रस्ताव नदीसुधार योजनेत असून सदर प्रकल्प निधी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नदी प्रदूषणामुळे नागरीकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याने शासनाने याबाबत निर्णय घेऊन नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी निधीची तरतूद करुन सदर प्रकल्प उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) धुळे महानगरपालिकेमार्फत रु.२५२.५८ कोटींचा पांझरा नदी सुधार प्रस्ताव पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनास पाठविण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्ताव परिपुर्ण नसल्याने, तो परत करण्यात आला आहे.
(४) धुळे महानगरपालिकेमार्फत पांझरा नदीपात्राची टप्प्याटप्प्याने स्वच्छता करण्याबाबत, तसेच दूषित पाणी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतात मिसळणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

तसेच, धुळे शहरातील मलनि:स्सारण प्रकल्पाचा अमृत अभियानाच्या २०१७-१८ च्या आराखड्यात समावेश करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील जेएनपीटी बंदराच्या वाढत्या भरावाच्या कामांमुळे समुद्रातील पाण्याची पातळी वाढल्याबाबत

**(२५) * ७३९५९ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जेएनपीटी बंदर (जि.रायगड) येथे वाढत्या भरावाच्या कामांमुळे समुद्रातील पाण्याची पातळी मोठया प्रमाणात वाढली असून जागतिक किर्तीच्या घारापुरी

बेटावरील सागरी किनारपट्टीचे बांध-बंदिस्ती, संरक्षक तट सागरी लाटांमुळे उध्वस्त झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने समुद्र किना-यावर संरक्षक भिंत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. जे.एन.पी.टी. बंदरामार्फत टर्मिनल ४ चा विकास करण्यात येत असुन त्यासाठी सेंट्रल वॉटर रिसर्च सेंटर (CWPRS) या संस्थेमार्फत अभ्यास करण्यात आला आहे. सदर अभ्यासानुसार घारापुरी बेटाच्या क्षेत्रात कोणताही विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. असे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी कळविले आहे.
(२) व (३) संरक्षक भिंत उभारण्याबाबत एलिफंटा गावकऱ्यांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव तपासण्यात येत असल्याचे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी कळविले आहे.

-----------------

**ऑटोमॅक्स टेक्नॉलॉजी लिमिटेड कंपनीने (ता. जि. पालघर) विद्युत महावितरण वीज देयकाची भरणा केंद्रे उभारुन नागरिकांची केलेली फसवणूक**

**(२६) * ७८३५७ श्री.अमित घोडा (पालघर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऑटोमॅक्स टेक्नॉलॉजी लिमिटेड कंपनीने (ता.जि.पालघर) दिनांक ५ मे, २०१६ रोजी विद्युत महावितरण वीज देयकाची भरणा केंद्रे उभारुन कोटयावधी रुपयांचा गोळा केलेला निधी प्रत्यक्षात विद्युत महावितरणाकडे जमा न करता फसवणूक केली असून उक्त गैरव्यवहारात स्थानिक तरुण वितरकांना ६० लाख रुपयांचा भुर्दंड सोसावा लागला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणातील प्रमुख आरोपीस पकडण्यास पोलिसांना अद्याप यश आले नसून उक्त प्रकरण आर्थिक गुन्हे विभागाकडे वर्ग करण्याबाबत स्थानिक लोकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मुख्य आरोपीला अटक करुन जास्तीत जास्त शिक्षा करुन नागरिकांना त्यांचे पैसा परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ऑटोमॅक्स टेकनॉलॉजी लिमिटेड कंपनीने विद्युत महावितरण वीज बिलाची भरणा केंद्र उभारुन गोळा केलेला निधी प्रत्यक्षात महावितरणाकडे जमा न करता कंपनीने फसवणूक केल्याबाबत पालघर जिल्ह्यात वाणगाव, मोखाडा, बोईसर, कासा, तारापूर या पोलीस स्टेशनमध्ये प्रत्येकी एक गुन्हा दाखल असून त्यामध्ये एकूण ४७,८१,९७६/- रुपयांचा अपहार झाला असल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी

१. वाणगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ०५/१७, भा.दं.वि. कलम ४०७, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे ४ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल असून त्यातील एका आरोपीस मा. जिल्हासत्र न्यायालय, पालघर यांनी जामीन मंजूर केलेला आहे व इतर ३ आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरु आहे.

२. मोखाडा पो. स्टे. येथे गु.र.क्र. ४५/१६ भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, १२० (ब), ३४ प्रमाणे ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल असून १ आरोपीस अटक करुन इतर ३ आरोपींचा शोध सुरु आहे.

३. बोईसर पो.स्टे. येथे गु.र.क्र. २४४/१६ भा.दं.वि. कलम ४०७, ४१९, ४२० , ४६५, ४६८, ४७०, ३४ प्रमाणे १० आरोपींविरुध्द गुन्हा दाखल असून ४ आरोपींना अटक करण्यात आली असून इतर ६ जणांचा शोध सुरु आहे.

४. कासा पो.स्टे. येथे गु.र.क्र. ११/१७ भा.दं.वि. कलम ४०७, ४१९, ४२० , ४६५, ४६८, ४७०, ३४ प्रमाणे ५ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल असून २ आरोपींना अटक करण्यात आली असून इतर ३ जणांचा शोध सुरु आहे.

५. तारापूर पो.स्टे. येथे गु.र.क्र. १०/१७ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ प्रमाणे ३ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल असून आरोपींचा शोध सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील इन्फोसिस कंपनीत महिला इंजिनियरची सुरक्षा रक्षकाने हत्या केल्याबाबत

**(२७) * ७७५७१ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील हिंजवडीतील फेज २ मधील इन्फोसिस कंपनीमध्ये दिनांक २९ जानेवारी, २०१७ रोजी इंजिनियर पदावर काम करणाऱ्या रसीका ओपी या महिलेचा सुरक्षा रक्षकाने केबलच्या वायरने गळा आवळून हत्या केली असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यातील माहिती तंत्रज्ञान उद्योगातील हिंजवडी आयटी पार्क परिसरात खून आणि अत्याचाराच्या वाढल्या घटनांमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन एका आरोपींविरुद्ध हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४९/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामधील आरोपीस अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेवस बंदराची (ता.अलिबाग, जि.रायगड) झालेली दुरवस्था

**(२८) * ७४५०४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात सन १९१३ मध्ये बांधण्यात आलेल्या रेवस बंदराची दुरावस्था झाली असून तेथील लोखंडी खांब गंजून व जागोजागी केलेले सिमेंटचे बांधकाम फुटल्यामुळे बंदराकडे जाणारा रस्ता धोकादायक झाला असून वाहनांना बंदी घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेवस-भाऊचा धक्का (मुंबई) व रेवस-उरण जलवाहतूकीव्दारे हजारो प्रवासी प्रवास करीत असूनही गत ३ ते ४ वर्षापासून रेवस बंदरातील गाळ काढला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेवस बंदरात प्रवासी कर २ रूपयांवरून १० रूपयापर्यंत घेतला जात असतानाही परिसरात कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरली असून बंदराचे मोडकळीस आलेले कार्यालय, विजेचा, पिण्याच्या पाण्याच्या अद्यावत व्यवस्थेचा व अन्य मुलभूत सुविधांचा अभाव असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रेवस बंदराची देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

रेवस बंदरात गाळ साचल्यामुळे ओहोटीच्या वेळी प्रवासी बोटी जेट्टीला लागत नाही हे खरे आहे. चालू हंगामात रेवस बंदरातील गाळ काढण्याचे प्रस्तावित आहे.

(३) व (४) शासन अधिसूचना क्र.ममेबो/मुकाअ/ वाहतूक-२/२०१५, दिनांक १६.९.२०१५ नुसार तिकीट दरावर आकारण्यात येणाऱ्या प्रवासी करावर सुधारणा करण्यात आली असून त्याप्रमाणे प्रवासी कराची आकारणी करण्यात येत आहे.

रेवस येथील जेट्टी दुरुस्ती करणे या कामाचा समावेश महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेला असून सदर कामाचे रु.१.९१ कोटी इतक्या किंमतीचे अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

तसेच, रेवस बंदरातील पोच मार्ग, कार्यालयाचे बांधकाम, सोलर लाईट प्रवाशांसाठीच्या मुलभूत सुविधा पुरविणे या कामाचे रु.४.२८ कोटी इतक्या किंमतीचे अंदाज पत्रक तयार करण्यात आले असून सन २०१६-१७ च्या महाराष्ट्र बोर्डाच्या अर्थसंकल्पात समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबईतील ऐरोली, बेलापूर व नेरुळ येथील महापालिका रुग्णालयात रुग्णालयीन उपकरणे खरेदी निविदा प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२९) * ७८८७५ श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील ऐरोली, बेलापूर व नेरुळ येथे बांधलेल्या महापालिका रुग्णालयात रुग्णालयीन उपकरणे खरेदी निविदा प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिका प्रशासनाने शासनाच्या खरेदी प्रक्रियाचे निर्देशाचे उल्लंघन करून सदर निविदा प्रक्रिया विशिष्ट ठेकेदारांमार्फत राबविली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असलेले महापालिकेचे संबंधित अधिकारी व ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीसाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेद्वारे ३ गटांमध्ये निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या. या निविदांना स्पर्धात्मक दर प्राप्त होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली.

पहिल्या गटातील निविदांना देण्यात आलेल्या द्वितीय मुदतवाढीनंतर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निविदांस अनुसरुन महानगरपालिकेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तर दुसऱ्या व तिसऱ्या गटाकरीता फेरनिविदा प्रसिद्ध करण्यात आल्या असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरामधील इव्हॉल्व कन्सलटन्सी कंपनीने जादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांची केलेली फसवणूक

**(३०) * ७७७७२ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामधील इव्हॉल्व कन्सलटन्सी कंपनीने जादा परतावा देण्याचे आमीष दाखवून नागरिकांची १०.५० कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दिनांक १७ जानेवारी, २०१७ आर्थिक व सायबर शाखेने दोन आरोपींना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इव्हॉल्व कन्सलटन्सी कंपनी कांबळे नावाच्या दाम्पत्यांनी दोन सहकाऱ्यांच्या मदतीने कोंढावा येथे सन २००९ मध्ये स्थापन करुन वर्षाला ६० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून लाखो रुपयांची गुंतवणूक करुन घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपींनाही अटक करुन गुंतवणूकदारांचे पैसे परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

पुणे शहरातील इव्हॉल्व कन्सलटन्सी कंपनीने जादा परतावा देण्याचे आमीष दाखवून ७० ते ८० नागरिकांची १०.४५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आर्थिक व सायबर शाखेने गुन्हा दाखल करुन एकूण चार आरोपीपैकी दोन आरोपींना दिनांक १६/०१/२०१७ रोजी व तदनंतर एका आरोपीस दिनांक २६/०१/२०१७ रोजी अटक केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी चार आरोपींविरुद्ध कोंढवा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२८३/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ सह एम.पी.आय.डी. कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील चार आरोपींपैकी मुख्य आरोपी हा बाहेरच्या देशात गेला असल्याने त्यास अटक करण्यात आलेली नाही. उर्वरीत तीन आरोपींपैकी दोन आरोपींना दिनांक १६/०१/२०१७ रोजी तर अन्य एका आरोपीस दिनांक २६/०१/२०१७ रोजी अटक करण्यात आलेली आहे. सदर तीनही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे-खार येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत चटई क्षेत्रफळ वाढवून करण्यात आलेला गैरव्यवहार

**(३१) * ७३८१६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-खार येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत ५ प्रकल्पामध्ये प्रकल्पबाधितांना घरे बांधून देण्याच्या नावाखाली विकासकांना लाभ मिळवून देण्याकरिता चटई क्षेत्रफळ वाढवून गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच खार येथील मोरदानी सिग्नेचर टॉवर, १६ वा रस्ता येथे झोपडया नसतांनाही झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवून १७ सदनिका, बालवाडी, कल्याण केंद्र तसेच सोसायटीचे कार्यालय बांधण्याऐवजी उक्त ठिकाणी ड्यूप्लेक्स सदनिका बांधल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाची फसवणूक करणा-या प्राधिकरणाच्या अधिका-यांवर व विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) सदर योजना हया विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या ३३(१४) अंतर्गत कायम स्वरुपी संक्रमण शिबीर बांधकामाबाबतच्या आहेत. नगर विकास विभागाच्या दि.३१/१०/२००८ रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार प्राधिकरणाकडून विकासक के. मोरदानी यांच्या खार, सांताक्रुझ (पश्चिम) व जोगेश्वरी येथील एकूण ६ योजनांचे एकत्रीकरण करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार विकासकास खार येथील १७ कायमस्वरुपी संक्रमण शिबीराचे ४१९.३६ चौ.मी. क्षेत्र जोगेश्वरी (पूर्व) येथे व तेवढेच जोगेश्वरी (पूर्व) येथील विक्री घटकाचे क्षेत्रफळ खार येथे स्थलांतरीत करण्यास अनुमती देण्यात आली आहे. सदरहू परवानगीच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद शासन आदेशातील तरतुदीनुसार विकासकाकडून रु.३,०४,३५,८७३/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. तथापि, विकासक के. मोरदानी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास द्यावयाच्या कायमस्वरुपी संक्रमण शिबीरातील १७ सदनिकांचे बांधकाम अद्याप केले नसल्याचे आढळून आले आहे.
(३) व (४) विकासकाने आजपर्यंत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास द्यावयाच्या कायमस्वरुपी संक्रमण शिबीरातील १७ सदनिकांचे बांधकाम सुरु केले नाही. यास्तव, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दि.०२.०१.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन विकासकाच्या विक्री घटकाच्या गाळ्यांची नोंदणी करण्यात येवू नये, असे दि.२३.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त नियंत्रक (मुद्रांक शुल्क) यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले असून विकासकाच्या विक्री घटकातील बांधकामास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.२४.०१.२०१७ रोजी स्थगिती दिली आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी/झोपुप्रा यांनी बांद्रा येथील विकासकाच्या विक्री घटकाच्या मिळकतीची फेरमोजणी करण्याचे आदेश जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख/झोपुप्रा यांना दिले आहेत.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मोरिवली एमआयडीसीतील सेंटॉर फार्मास्यूटीकल कंपनीतून ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने अंमली पदार्थ (ड्रग्ज) जप्त केल्याबाबत

**(३२) * ७४६४२ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा),**

**श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मोरिवली एमआयडीसीतील सेंटॉर फार्मास्यूटीकल कंपनीमधून ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने रुपये १८ कोटी ८५ लाखांचा ७५४ किलो अल्प्राझोलम हा अंमली पदार्थ (ड्रग्ज) जप्त केल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कंपनी प्रशासनावर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली असून, त्यांचेकडून, एकूण ७५९.९८० किलो वजनाचा रु.१९.०० कोटी किमतीचा अल्प्राझोलम व इतर अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. तपासामध्ये यापैकी दोन आरोपी हे सेंटॉर फार्मासिटीकल प्रा.लि., अंबरनाथ या कंपनीत कामगार असल्याचे व त्यांनी कंपनीतील मालाची चोरी केल्याचे निष्पन्न झाले. या कंपनीमध्ये नार्कोटीक्समध्ये मोडणारे २७ प्रकारचे सायकोट्रॉपीक सबस्टन्स (ड्रग्ज) तयार केले जातात. सदर प्रकरणी चौकशी चालू असून, गुन्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येवला (जि. नाशिक) येथील तहसिलदाराने नवीन अविभाज्य शर्तीच्या जमीन खरेदी-विक्रीची बेकायदा परवानगी दिल्याबाबत**

**(३३) * ७४२४१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि. नाशिक) येथील तहसिलदाराने नवीन अविभाज्य शर्तीच्या जमीन खरेदी-विक्रीची परवानगी देण्याचा अधिकार नसतानाही बेकायदा परवानगी देवून शासनाची तब्बल पावणेचार कोटी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी प्रांत अधिकारी, तहसिलदार यांचे सह २३ महसूल विभागाच्या अधिका-यांवर तसेच १२ खासगी व्यक्ती विरुध्द दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी नांदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषींविरूध्द शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे. सदर प्रकरण हे येवला येथील नसुन नांदगांव जिल्हा नाशिक येथील आहे.

सदर प्रकरणी एकुण २३ आरोपीनी संगनमत करुन शासनाचा एकुण रुपये ३,८५,४०,२८८/- इतका महसुल बुडवून शासनाची फसवणुक केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याअनुषंगाने महसुल विभागाच्या ११ अधिकारी/कर्मचारी व १२ खाजगी व्यक्तींविरुध्द नांदगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०१/२०१७ अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या विविध कलमानुसार व भा.द.वि. तील कलमानुसार दि.०५/०१/१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील उपलवाडी औद्योगिक परिसरातील**
**नितीका फार्मा कंपनीत झालेला स्फोट**

**(३४) * ७४८०५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील उपलवाडी औद्योगिक परिसरातील नितीका फार्मा केमिकल कंपनीत दिनांक २ डिसेंबर, २०१६ रोजी बॉयलरचा स्फोट होऊन १५ कर्मचारी जखमी व ५ जणांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच मृत व जखमी कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना अर्थसहाय्य करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर येथील नितीका फार्मासिटीकल्स स्पेशालिटिज प्रा. लि. या कारखान्यात फ्ल्युडाईज्ड बेड ड्रायरमध्ये स्फोट होवून लागलेल्या आगीत एकूण ११ कामगारांचा मृत्यू झाला होता. सदर आगीत भाजलेल्या १२ कामगारांपैकी ११ कामगारांना उपचाराअंती दवाखान्यातून सुटी दिली असून एका कामगारावर अद्यापही दवाखान्यात उपचार सुरु आहेत.

(२) होय.

पोलिस विभाग आणि औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, नागपूर तर्फे सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे.

(३) कारखाना सुरू असतांना रात्री अंदाजे १०.०० वा. चे सुमारास अचानक कारखान्यातील FBD (Fluidised Bed Dryer) चा स्फोट झाला व आग लागली. सदरची आग कारखाना परिसरात इतरत्र पसरली.

पोलिस विभागाने कारखान्याचे भोगवटादार आणि संचालक व व्यवस्थापक यांच्या विरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच कारखान्याचे भोगवटादार, सिनीयर ऑपरेशन मॅनेजर व मेन्टेंन्स मॅनेजर यांना अटक केली होती.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातर्फे कारखाने अधिनियम १९४८ तसेच महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ च्या तरतुदींच्या भंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादार/ व्यवस्थापकावर एकूण ०९ फौजदारी खटले मा. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांचे न्यायालयात दाखल केले आहेत. तसेच कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया सुरक्षा उपाययोजना करेपर्यंत बंद करण्याचे आदेश भोगवटादारास पारित केले आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने कारखान्याचे व्यवस्थापनावर कारखाना बंदचे आदेश पारित केले आहेत.

कारखान्यातील कामगार राज्य विमा कामगार योजनेअंतर्गत पंजिबध्द असल्याने त्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे. तसेच व्यवस्थापनाने ८ मृत कामगारांच्या वारसदारांना प्रत्येकी २ लाख रुपये सानुग्रह अनुदान दिले असून उरलेल्या ०३ मृत कामगारांचे कायदेशीर वारसदार निश्चित न झाल्याने त्यांना रक्कम अद्याप वितरीत केलेली नाही. सदर अपघातातील जखमींच्या उपचारार्थ अद्यापपर्यंत रुपये ३९,२९,३१९/- खर्च झाला असून कारखान्याच्या भोगवटादाराने त्यापैकी रुपये ३२,२८,८६२/- अदा केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अहमदनगर तसेच ठाणे जिल्हयात अनधिकृतरित्या गोमांसाची वाहतूक करण्यात येत असल्याबाबत

**(३५) * ७६९४५ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड शहर (जि. अहमदनगर) कुरेशी मोहल्ला येथील जनावरांच्या कत्तलखान्यावर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात २ हजार १३० किलो गोमांस व ८ जीवंत जनावरे कत्तल करण्यासाठी वाहनात भरत असतांना सुमारे १० लाख रुपयाचा मुद्येमाल जप्त केल्याची घटना दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे जिल्हा पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र पशुसंवर्धन कायद्याचे उल्लघन करुन हजारो किलो गोमांसाची वाहतूक होत असल्याची तक्रार गोवंश संरक्षक संवर्धन परिषदेने दिनांक २५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान पोलीसांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चोकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गुन्हेगारांवर कोणती कडक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात अशाप्रकारचा तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही.

(३) जामखेड, जि. अहमदनगर येथील घटनेबाबत जामखेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. II १२२/२०१६ भा.दं.वि. कलम ४२९, ३४ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५ (क)(ड) ९ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ६ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

तसेच ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र पशुसंवर्धन कायद्याचे उल्लंघन केल्याबाबत १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पवई तलावात बोट उलटून तीन जणांचा झालेला मृत्यू

**(३६) * ७३९६२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई तलावात बोट उलटून तीन जणांचा मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावात महाराष्ट्र राज्य ॲगलिंग असोसिएशनद्वारे अवैध मासेमारी व पार्टीसाठी बोटी दिल्या जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच पवई तलावाच्या सुरक्षतेच्यादृष्टिने हाऊस बोटींना बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र स्टेट ॲगलिंग असोशिएशन संस्थेमार्फत पवई तलावात मासेमारी हक्कासह काही अटी व शर्तीसापेक्ष दि. १.१.१९३७ पासून भाडेपट्टयाने करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संस्थेस मासेमारी व्यतिरिक्त बोटीग करण्याची परवानगी नाही. या घटनेत श्री.न्युटॉन यांच्या अनधिकृत बोटीचा दि. २३.१२.२०१६ रोजी अपघात झालेला आहे.

(३) सदर अपघाताप्रकरणी पवई पोलिस ठाण्यामध्ये उक्त संस्थेविरुध्द दि. २६.१२.२०१६ रोजी गु.र.क्र. ५९२/२०१६ कलम ३०४ (अ), १०९ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तलावात रात्रीच्या वेळी होणाऱ्या अनधिकृत मासेमारीबद्दल आवश्यक ती कार्यवाही व गस्त ठेवण्याची पवई पोलीस ठाणे यांना सूचना दिल्या आहेत.

सदर तलावातील बोटींग/ मासेमारी थांबविण्याकरिता महाराष्ट्र स्टेट ॲगलिंग असोशिएशन यांचेवर नोटिस बजावण्यात आलेली असून सदर प्रकरणी नगर दिवाणी व सत्र न्यायालयात एल.सी. सुट नं. ३३६३/२०१४ व ३४०१/२०१४ अन्वये दावा प्रलंबित असून मा. न्यायालयाचे अंतरिम स्थगिती आदेश आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महादुला नगर पंचायतीमध्ये (जि.नागपूर) ई-टेंडरिंग न करता कंत्राटदारांना कामे देण्यात आल्याबाबत

**(३७) * ७७८२१ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महादुला नगर पंचायतीमध्ये (जि.नागपूर) सन २०१३-१४, २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण अहवालात कलम ९ अ, ब, क, ड या प्रमाणे गंभीर आक्षेप नोंदवून मोठया प्रमाणात अनियमितता झाल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात ई-टेंडरिंग न करता कंत्राटदारांना कामे देण्यात येणे, निविदा एका कंत्राटदाराच्या नावे मंजूर करुन करारनामा दुसऱ्या कंत्राटदाराच्या नावे करणे, मंजूर रक्कमेपेक्षा जादा रक्कमेचे देयके कंत्राटदारास देणे, निधीचा दुरुपयोग करणे इत्यादी आक्षेप नोंदविल्यामुळे यात मुख्याधिकारी,

पदाधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ मधील लेखा परिक्षणात आक्षेप नोंदविण्यात आले आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) लेखा परिक्षण अहवालातील आक्षेपांची पूर्तता नगरपंचायतीमार्फत अनुपालन अहवालाद्वारे करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवालात नोंदविलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्याबाबत आणि या प्रकरणी कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली आहे किंवा कसे याबाबत चौकशी अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, सेक्टर १५ येथील सिडकोने विकसित केलेल्या घरकुल प्रकल्पाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(३८) * ७४५०९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडकोने विकसित केलेल्या खारघर, सेक्टर १५ येथील घरकुल प्रकल्पाची पुनर्बांधणी सिडकोमार्फत तातडीने करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींची काही वर्षांपूवी सिडकोमार्फत तात्पुरती डागडूजी करण्यात आली होती परंतु इमारतींची अवस्था सध्या रहाण्यास योग्य नसून मोडकळीस आलेल्या इमारतींमुळे मोठी दुर्घटना होवून जिवीतहानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोमार्फत सदर इमारतींची तातडीने पुनर्बांधणी करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) सिडकोने खारघर, सेक्टर १५ मधील घरकुल गृहनिर्माण प्रकल्प सन २००२ ते २००४ दरम्यान विकसित केला आहे. सदर प्रकल्पामधील इमारतींची संरचनात्मक तपासणी सन २०१४ च्या दरम्यान मे.स्ट्रक्टवेल डिझाईनर ॲण्ड कन्सल्टंन्स प्रा. लि. यांच्याकडून करण्यात आली आहे. सदर तपासणी अहवालानुसार या इमारतींचा सांगाडा स्थिर व सुरक्षित आहे. त्यामुळे या इमारतींची डागडूजी केल्यास सदर इमारतींचे वयोमान चांगल्या प्रमाणात वाढेल. त्यामुळे संरचनात्मक तपासणी अहवालानुसार इमारतींची पुनर्बांधणी सध्या अपेक्षित नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कंबाटा एव्हिएशन कंपनीने कामगारांचे वेतन व इतर देणी थकीत ठेवून कंपनी बंद केल्याबाबत**

**(३९) * ७४६४४ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विमानतळावर ग्राऊंड हँण्डलिंग एजंट म्हणून काम करणारी कंबाटा एव्हिएशन कंपनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये अचानक बंद करण्यात आली असून सुमारे २१०० कामगारांचे दहा महिन्याचे वेतन व इतर देणी थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कामगारांचे थकीत वेतन व इतर देणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) कंबाटा एव्हिएशन या कंपनीच्या व्यवस्थापनाने आस्थापना बंद करीत असल्याबाबतची कायदेशीर नोटीस अद्यापपर्यंत दिलेली नसली तरी कंपनीचे कामकाज माहे ऑगस्ट, २०१६ पासुन बंद झाले असुन माहे मार्च, २०१६ पासुन कामगारांचे थकित वेतन अदा करण्यात आलेले नाही, हे खरे आहे.
(२) होय, कामगार आयुक्त, केंद्रीय श्रम आयुक्त, भविष्य निर्वाह निधी या संबंधित कार्यालयांनी उक्त प्रकरणाची चौकशी केली असुन व्यवस्थापनाने मार्च, २०१६ पासुन कामगारांचे थकित वेतन व भत्ते अदा केले नसल्यामुळे व्यवस्थापनाविरुद्ध विविध अधिनियमांतर्गत खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच मा.औद्योगिक न्यायालयाच्या आदेशांनुसार कंपनीची मालमत्ता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जप्त करुन वसूलीची कार्यवाही सुरु केली आहे.

दरम्यान कामगारांचे थकित वेतन व इतर कायदेशीर रकमा वसूल होण्याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी, याकरिता शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार केंद्रीय श्रम आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली असुन या समितीमार्फत  कामगारांचे थकित वेतन व इतर भत्ते मिळवून देण्यासंदर्भात प्रयत्न सुरु आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यातील विशेषत: अहमदनगर, तळोजा, ठाणे मध्यवर्ती कारागृह, आर्थररोड व आधारवाडी कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक कैदी ठेवण्यात येत असल्याबाबत

**(४०) * ७३९६५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व),**

**श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अहमदनगर, तळोजा, ठाणे मध्यवर्ती कारागृह, आर्थररोड व आधारवाडी कारागृह, मुख्य कारागृह तसेच इतर छोट्या कारागृहांची स्थापत्य रचना व उपलब्ध सुविधांचे वास्तव लक्षात घेता २३ हजार ९४२ कैदी शिक्षा भोगू शकतील इतकी क्षमता असलेल्या कारागृहांमध्ये ३१ हजार २१८ कैदी वास्तव्यास असून कैद्यांची संख्या ३० टक्क्यांनी वाढल्याचे कारागृह प्रशासनाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिलेल्या आकडेवारीवरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कारागृहामध्ये सातत्याने वाढत असलेल्या कैद्यांच्या संख्येमुळे शौचालय, बाथरुम, किचन यासारख्या अन्य सुविधांवर मोठा परिणाम होत असून कैद्यांच्या तुलनेत कारागृहातील सुरक्षा रक्षक व अधिकारी यांच्या अपूऱ्या संख्येमुळे कैद्यांमध्ये होणारी हाणामारी, मोबाईल फोनचा वापर, कैदी पळून जाण्याचे प्रकार, टोळी युध्द यासारख्या घटना वारंवार घडत असून गत पाच वर्षात राज्यांमध्ये १६२ कैदी मृत झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात नवीन कारागृह बांधण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनाला माहे डिसेंबर, २०१६ मध्ये आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन कारागृह बांधण्याबाबत व सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) काही कारागृहांमध्ये प्रमाणापेक्षा जास्त कैदी आहेत तथापि त्यामुळे कैदी पळून जाणे टोळी, युध्द व कैद्यांचा मृत्यू झाला आहे हे म्हणणे खरे नाही.

(३) सध्या अस्तित्वात असलेल्या कारागृहात अतिरिक्त बॅरॅक बांधणे तसेच नवीन कारागृह बांधणे यासंबंधीचा कालबध्द कार्यक्रम राज्य शासनाने निश्चित करावा असे आदेश मा. उच्च न्यायालयाने क्रिमीनल पीआयएल क्र.४६/२०१५ मध्ये दिनांक-०१/०३/२०१७ रोजी दिले आहेत.

(४) व (५) मूळ कारागृहात जागा असेल तेथे अतिरिक्त बॅरेक बांधणे नवीन कारागृह बांधण्यासाठी जागा संपादित करणे याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

सुधारित आकृतीबंधामध्ये सुरक्षकांची पदे मंजूरीबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून प्रस्तावाची छाननी सुरु आहे तसेच रक्षकांची रिक्त पदे पोलीस विभागाकडून भरण्याची कार्यवाही देखिल सुरु आहे.

-----------------

**लातूर येथील किर्ती ऑइल मिलची टाकी स्वच्छ करताना कामगारांचा गुदमरुन झालेला मृत्यू**

**(४१) * ७७८२५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील किर्ती ऑइल मिलची टाकी स्वच्छ करण्याकरिता दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी टाकीमध्ये उतरलेल्या ९ कामगारांचा विषारी रसायनामुळे गुदमरुन मृत्यू झाल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नऊ कामगार टाकी बाहेर आले नसल्याचे बघून पुन्हा टाकीमध्ये उतरविण्यात आलेल्या कामगाराची प्रकृती चिंताजनक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किर्ती ऑइल मिलची टाकी स्वच्छ करण्याकरिता विषारी रसायनाचा वापर केला जात असल्याची कल्पना कामगारांना देण्यात आली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.

(२) हे खरे नाही,

दोन कामगार टाकीच्या वरील प्लॅटफॉर्मवर काय घटना घडली हे बघण्याकरीता आले असता त्यांना सुध्दा विषारी वायुची बाधा झाली व ते अत्यवस्थ झाले.

(३) सदर कारखान्यातील टाकीमध्ये स्लज (गाळ) जमा होते. सदर स्लज (गाळ) चार महिन्यातून एकदा बाहेर काढून टाकी स्वच्छ करण्यात येते. स्लज (गाळ) काढण्याकरीता कुठल्याही विषारी रसायनाचा वापर केला जात नाही. परंतु टाकीत स्लज (गाळ) हा ब-याच कालावधीकरीता जमा असल्याने तेथे विषारी वायुची निर्मिती होते.

(४) सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मराठवाडा विभागामार्फत कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम १९४८ व व्यवस्थापनाविरुध्द महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या भंगाबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे तसेच कायदेशीर कारवाई प्रस्तावित आहे. कारखाने अधिनियम १९४८ अन्वये भोगवटादारावर कारखाना बंदचे आदेश बजावले आहेत. पोलिस विभागाने कारखान्याचे भोगवटादार व इतर ३ व्यक्तींवर भारतीय दंड विधान ३०४(२) अन्वये गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाही चालू आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-याने सदर कारखाना बंद केल्याचे आदेश पारीत केले आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.